सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# अहमदनगर जिल्हा विभागीय क्रीडा समिती

द्वारा- श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, नेप्ती, अ.नगर ४१४००५

Website - www.ahmednagarzonalsports.org / Email - nagarzone2018@gmail.com

प्रा.डॉ.विजय म्हस्के (मो.9850648447) सचिव

प्राचार्य डॉ.राजकुमार देशपांडे (मो.7030579021) अध्यक्ष

प्रा.डॉ.रविंद्र शिर्के (मो.9423463087) सहसचिव

प्रा..गणेश नरोडे (मो.7350225999) सहसचिव

---

संदर्भः— अजिस्थाक्रीस/२०१८—१९/१२ दि.०४/०७/२०१८

प्रति,

**मा.प्राचार्य / शारीरिक शिक्षण संचालक,**

सर्व सलंग्न महाविद्यालये,

अहमदनगर जिल्हा क्रीडा विभाग, अहमदनगर

स.न.वि.वि.

सप्रेम नमस्कार,

सन २०१८—१९ या वर्षात होणा—या क्रीडा स्पर्धांना ऑगस्टमध्ये सुरूवात होत आहे. या स्पर्धांसाठी आपणास अहमदनगर जिल्हा विभागीय क्रीडा समितीच्या वतीने हार्दिक शुभेच्छा!!!

या वर्षामध्ये होणा—या क्रीडा स्पर्धांसंदर्भात संपुर्ण माहिती व स्पर्धेचे वेळापत्रक आपणास ईमेल द्वारे तसेच शारीरिक शिक्षण संचालक यांच्या व्हॉटस्प् ग्रुप व समितीच्या www.ahmednagarzonalsports.org या वेबसाईटवर अपलोड करण्यात आले आहे. या स्पर्धांची नियमावली सुध्दा आपणास पाठविण्यात आली आहे. तरी काही शंका असल्यास समितीचे सचिव यांच्याशी संपर्क करावा.

**<u>खालील सुचनांची सर्वांनी नोंद घ्यावी :—</u>**

१) अहमदनगर जिल्हा विभागीय क्रीडा समितीच्या वतीने दिलेल्या नियम व अटींचे काटेकोरपणे पालन सर्व संघांनी, संघ व्यवस्थापक व महाविद्यालयांनी करावे. जेणे करून बोगस खेळाडू खेळणार नाही.

२) अनेक कॉलेजकडून खेळाडूंचे प्रोफार्म योग्य रितीने भरले जात नसल्याने अनेक चुका होता, खाडा खोड होते, मा.प्राचार्य यांची सही नसणे, कॉलेजचा गोल स्टॅम्प/शिक्का नसणे अशा चुका होतात. त्यामुळे खेळाडू स्पर्धेपासून वंचित राहातो याबाबत दक्षता घेण्यात यावी.

३) १०वी बोर्ड प्रमाणपत्र (जन्मतारीख असलेले), १२ वी मार्कशिट, डिप्लोमाचे मार्कशिट या झेरॉक्सवर मा.प्राचार्य यांचे ॲटेस्टेड असणे क्रमप्राप्त आहे. झेरॉक्स ॲटेस्टेड नसेल तर खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होता येणार नाही. तसेच ओरिजनल प्रमाणपत्र बरोबर ठेवणे.

४) स्पर्धेदरम्यान खेळाडूंना क्रीडा गणवेश असणे महत्वाचे आहे. तसेच त्याच्या मागे व पुढे चेस्ट नंबर निवड समितीला व्यवस्थित दिसेल असा टाकावा.

५) स्पर्धेमध्ये बोगस खेळाडू खेळतांना आढळल्यास सदरील संघ त्वरीत बाद केला जाईल व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नियमानुसार संबंधित कॉलेजवर कारवाई केली जाईल.

६) स्पर्धेदरम्यान काही वाद उद्भवल्यास अन्यथा एखद्या संघ, खेळाडू यांच्याबाबत तक्रार असल्यास संघ व्यवस्थापकाने त्वरीत ५०० रूपये भरून लेखी अर्ज करावा. जेणे करून त्वरीत तक्रार निवारण समितीसमोर ठेवून त्याबाबत योग्य तो निर्णय दिला जाईल.

७) स्पर्धेची रिपोर्ट वेळ सर्व संघांनी पाळावी. उशिरा आलेल्या संघांच्या स्पर्धेदरम्यान विचार केला जाणार नाही.

८) विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंनी दिलेल्या वेळेतच स्पर्धेच्या ठिकाणी ओरिजनल प्रमाणपत्र घेवून संघ व्यवस्थापकास रिपोर्ट करावा.

९) विभागीय स्पर्धेत खेळाडू सहभागी होणार नसेल तर त्वरीत संबंधित कॉलेजच्या शारीरिक शिक्षण संचालकांनी विभागीय सचिवांना याबाबत माहिती द्यावी. जेणे करून राखीव खेळाडूंना त्या स्पर्धेकरिता पाठविता येईल.

१०) सन २०१८–१९ या वर्षाचे ओळखपत्र खेळाडूकडे असणे बंधनकारक आहे. ओळखपत्र नसल्यास खेळाडूला खेळता येणार नाही.

११) सन २०१७–१८ या मागील वर्षाचा प्रोरेटा भरलेला नसेल तर त्या कॉलेजला स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

वरील सुचनांचे आपण सर्वांनी पालन करावे ही विनंती. तसेच अहमदनगर जिल्हा विभागीय क्रीडा समितीच्या वतीने आयोजित स्पर्धांसाठी सहकार्य करावे.

तसेच पुन्हा आपणास सन २०१८–१९ मध्ये सुरूवात होत असलेल्या क्रीडा स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा!!!

**प्रा.डॉ.विजय म्हस्के**
सचिव

**प्राचार्य डॉ.आर.एस.देशपांडे**
अध्यक्ष

**अहमदनगर जिल्हा विभागीय क्रीडा समिती**